शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

बी.ए. भाग २ मराठी पेपर नं. ६

पाठ्यपुस्तक —जुगाड — लेखक किरण गुरव

sub code -- 73434

संभाव्य प्रश्नसंच (Question Bank)

प्रश्न १ला. **योग्य पर्याय निवडा**

१. किरण गुरव यांच्या पहिल्या कादंबरीचे नाव काय?

अ. वडाप ब. जुगाड क. राखीव सावल्यांचा खेळ ड. श्रीलिपी

२. जुगाड या कादंबरीला ..........चे सुपष्ट संदर्भ आहेत.

अ. राष्ट्रवादाचे. ब. आधुनिकतेचे क. इतिहासाचे ड. दलित जाणिवांचे

३. जुगाड या कादंबरीतील कथासूत्राच्या केंद्रस्थानी ..........भागातील नवशिक्षित तरूण आहेत.

अ. निमशहरी ब. ग्रामीण क. महानगरी ड. शहरी

४. पुण्यातील शशाचा जीवलग मित्र कोण?

अ. पुष्या ब. माळवी क. गोप्या ड. डिसुझा

५. कादंबरीतील नायक शशा पुण्यातील कोणत्या लॉजवर मुक्कामाला असतो?

अ. स्वस्तिक लॉज ब. श्री लॉज क. गणेश लॉज ड. गंगा लॉज

६. इनकॉममध्ये कंपन्याचे कॉल देण्याचे मुख्य काम कोण करत होता?

अ. डिसुझा ब. माळगी क. नायर ड. चिखलीकर

७. सासवडच्या कोणत्या कंपनीत शशाने इंटरव्ह्यू दिला होता?

अ. कल्पना टूल्स ब. इंडिया फोर्ज क. सीताराम इंजिनिअरिंग ड. हॉलमार्क

८. कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखेच्या नोकरीचा प्रवास .........असा झाला आहे.

अ. शहर ते गाव ब. गाव ते महानगर क. निमशहर ते शहर ड. निमशहर

ड. निमशहर ते महानगर

९. शशा आणि शशाच्या सहकारी घडणीचा व्यक्तिरेखांच्या भोवतालचे जग.....

......... व्यापलेले आहे.

अ. उद्योगधंद्याने ब. शेती व्यवसायाने क. खाणकामाने ड. बांधकामाने

१०. शशा हा अभियांत्रिकीतील ......... या ट्रेडचा पदविधारक आहे.

अ. मेकॅनिकल ब. सिव्हिल क. इलेक्ट्रीकल ड. एरोनेटिक

११. शशाने नोकरीची सुरूवात ...........मधून करतो.

अ. सीताराम ब. टेलिको क. राधामाई ड. कल्पना टूल्स

१२. कादंबरीतील दासगुप्ता हे.......... चे पदाधिकारी होते.

अ. हॉलमार्क ब. वुईमन क. पुष्प कन्स्ट्रक्शन ड. सीताराम

१३. जुगाड मधील पहिला भाग कोणत्या महानगरात घडतो.

अ. मुंबई ब. पुणे क. सांगली ड. सातारा

१४. कल्पना टूल्सची माहिती शशाला .........कडून मिळते.

अ. मामा ब. चिखलीकर क. डुणूंगसाहेब ड. चेअरमन

१५. शशा टेलिको कंपनीतल्या हायटेक लाईनवर ........डिपार्टमेंटमध्ये काम करत होता?

अ. स्टोअर ब. परचेस क. रिसर्च ड. क्वालिटी कंट्रोल

१६. शशा आणि शशाचे सहकारी मित्र ......... विद्याशााखेशी संबंधित होते.

अ. मेडिकल ब. कला. क. वाणिज्य ड. अभियांत्रिकी

१७. डिसुझाने हळूहळू शशाला ........द्यायला सुरूवात केली होती.

अ. क्वालिटी कंट्रोलची विद्या ब. सीएनसी विद्या क. झाईसविद्या

ड. यापैकी नाही.

१८. शशाचा मित्र पुष्या कोणत्या कंपनीत पर्मनंट झाला.

अ. इंडिया फोर्ज ब. कल्पना टूल्स क. टेलिको ड. सीताराम

१९. जुगाड कादंबरीमध्ये कोणत्या निवेदन पध्दतीचा अवलंब केला आहे.

अ. प्रथमपुरूषी ब. तृतीयपुरूषी क. संमिश्र ड. द्वित्तीयपुरूषी

२०. जुगाडचा कथनकर्ता कोणाच्या नजरेतून भोवतालचे वर्णन करतो?

अ. जय ब. सीमा क. शशा ड. पुष्या

२१. जुगाड या शब्दाचा अर्थ शशाला कोणी सांगितला आहे?

अ. युसूफ ब. जय क. सुब्रम्हण्यम ड. गोपीचंद

२२. जुगाड मध्ये कोणत्या वाक्यांचे प्रमाण अधिक आहे?

अ. केवलवाक्य ब. मिश्र क. संयुक्त ड. प्रश्नार्थक वाक्ये

२३. माझ्या जागी तू असतास तर काय केलं असतंस? हे वाक्य कोणाचे ?

अ. शितोळे ब. मणेर क. गोपीचंद ड. शशा

२४. या कादंबरीच्या दुसऱ्या भागामध्ये कोणत्या परिसरातील बोली आली आहे

अ. मुंबई ब. पुणे क. कोल्हापूर ड. सोलापूर

२५. एचफोर सेक्शनमध्ये साहेबांची लाचारी करणारा कोण आहे?

अ. पुष्या ब. माळवी क. गोप्या ड. डिसुझा

२६. राधामाईच्या सिव्हिल इंजिनिअरचे नाव काय?

अ. सीमा ब. शशा क. युसूफ ड. जय.

२७. बॅंकेकडून प्लांटचे इन्स्पेक्शन करायला कोण आले होते?

अ. भूमिनंदन ब. खासदार क. डुणुंग साहेब ड. श्रीनिवासन

२८. राधामाई मिनरलने कोणत्या बॅंकेकडून कर्ज घेतले होते?

अ. महाराष्ट्र बॅंक ब. आयडीबीआय. क. एसबीआय ड. पंजाब बॅंक

२९. सीमाच्या वडिलांनी पाहुण्यांसाठी कोठे सहल आयोजित केली होती?

अ. राधानगरी धरण ब. दाजीपूर क. आंबोली ड. पाटगाव धरण

३० राधामाई प्रोजेक्ट उभा करण्यामागे चेअरमनसाहेबांचा छुपा हेतू काय होता?

अ. बॉक्साईट मिळवणे ब. रोजगार निर्माण करणे क. गावाचा विकास

ड. जंगल तोड करणे

३१. शेळणीलीकर यांचा विश्वास कोणत्या ज्योतिषावर होता?

अ. गणेशभट ब. अंतूभट क. बाळूभट ड. जय

३२. कल्पना टुल्स कंपनीत शशाची मुलाखत कोणी घेतली?

अ. डुणुंग साहेब ब. भूमिनंदन क. डिसुझा ड. शिणोलीकर

३३ 'बाईही चर्चक' असे निवेदकाने कोणास म्हटले आहे?

अ. सीमा ब माला क. भोपेकाकू ड. शशाची आई

३४ राधामाइच्या साईटवर शशाला भेटायला पुण्यातील कोणता मित्र आला होता?

अ. पुष्प्या ब. गोप्या क. मणेर ड. डिसुझा

३५. किरण गुरव योच्या पहिल्या कथासंग्रहाचे नाव काय आहे?

अ. श्रीलिपी ब. राखीव सावल्यांचा खेळ क. बाळूच्या अवस्थांराची डायरी ड. जुगाड

३६. क्वालिटी कंट्रोलचा देव त्याला कशाचा भेव?

अ. रिजेक्शनचा ब. पासिंगचा क. ब्रेकडाउनचा ड. टेंपरिरिचा

३७. ''तो सिव्हील सिव्हीलने मिलके मेकॅनिकल का पत्ता काट दिया?'' असे कोण म्हणतो?

अ. साजी ब. जय क. युसूफ ड. गोप्या

३८. राधामाइची साईट पाटगाव तालुक्यातील कोणत्या गावी सुरू होती?

अ. मरळी ब. शिरवळ क. पडसाटी ड. राधानगरी

३९. शशा आणि आणखी एक भिडू कोणाच्या लग्नाला जायाचे टाळतात?

अ. माळवी ब. गोपीचंद क. डिसुझा ड. पुष्प्या सावंत

४०. चिखलीकर शशाला सासवडच्या कोणत्या कंपनीचा कॉल देतो?

अ. कल्पना टूल्स ब. टेलिको क. सिर्लोस्कर ड इंडिया फोर्ज

४१. ` कोल्हापूरच्या भगवा रक्षक शिवप्रेमी तरूण मंडळाचे कार्यकर्ते कोणत्या लॉजवर राहत होते?

अ. श्री लॉज    ब. स्वस्तिक लॉज    क. संपत लॉज    ड. सपना लॉज

४२. जुगाड या कादंबरीतील कथनशैलीचे स्वरूप कसे आहे?

अ. व्यामिश्र    ब. एकरेषीय    क. प्रयोगशील    ड बहुरेषीय

४३. जुगाड मधील शैलीवर कोणत्या मराठी गद्याचा प्रभाव आहे?

अ. आधुनिक    ब. महानुभाव    क. बखर वाङमय    ड. वारकरी

४४. ......... हा साहित्य प्रकार एकाचवेळी अनेक आशयसूत्रांना आपल्यामध्ये सामावून घेण्याची क्षमता बाळगून असतो.

अ. कथा    ब. कविता    क. नाटक    ड कादंबरी

४५ जुगाड या कादंबरीमध्ये भूतकाळाच्या उदात्तीकरणापेक्षा ........च्या चिकित्सेला महत्त्व प्राप्त झाले आहे.

अ. राजकीय    ब. भविष्यकाळाचे    क. समाजाच्या    ड. वर्तमानाच्या

४६. राधामाई मिनरलच्या सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाचे काम कोणती कंपनी करायची?

अ. एचफोर    ब. प्रभा कन्स्ट्रकशन    क. हॉलमार्क    ड. वुईमन

४७. शशाने राधामाईची नोकरी स्विकारल्या नंतर जेवणाची सोय कोठे केली?

अ. सीमाच्या घरी    ब. भोज्याच्या हॉटेलमध्ये    क. विठ्ठल टी हाउस    ड. भोपे काकूकडे

४८. किलन चढविण्याचे काम शिटटीच्या तालावर कोण करवून घेत होता?

अ. साजी    ब. युसुफ    क.जय    ड. दत्ता

४९. कोल्हापूरच्या हेडऑफिसमध्ये राधामाईच काम कोण पहात होते?

अ. युसुफ    ब. चव्हाण साहेब    क.जाधवसाहेब    ड. भूमिनंदन

५०. जुगाड कादंबरीतील कथानकाच्या घडणीचा काळ हा सर्वसाधारणपणे ..........आहे.

अ. १९८५ ते १९९५    ब. १९७५ते १९९५ क. १९९५ ते २००५ ड. २००५ ते २०१५

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. समकालीन मराठी कादंबरीच्या पार्श्वभूमीवर किरण गुरव यांच्या जुगाड या कादंबरीच्या आशय विश्वाचे स्वरूप स्पष्ट करा.

२. १९९० नंतरच्या काळातील बदलाच्या संदर्भाने जुगाडमधील आशय सूत्राचे स्वरूप विस्ताराने सांगा

३. किरण गुरव यांनी अंत्यत साक्षेपीपणे बेकारीचा अनुभव घेणाऱ्या तरूणांच्या नजरेतून कादंबरीत चित्रण केले आहे हे तुमच्या शब्दात स्पष्ट कराञ

४. किरण गुरव यांच्या जुगाड या कादंबरीमध्ये समकालीन उद्योगजगताचे सूक्ष्म दर्शन घडते या विधानाचा विस्ताराने वेध घ्या.

५. रोजगाची अनिश्चितता हे जुगाड मधील प्रधान आशयसूत्र आहे याची नोंद घ्या.

६. कठीण काळात देखील टिकून राहण्याची लस देणारी कादंबरी म्हणून जुगाडकडे पाहता येईल हे विधान साधार स्पष्ट करा.

७. किरण गुरव यांची जुगाड ही कादंबरी जगण्यातील सर्जनशक्यतांचा शोध घेण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न करते त्याचे स्वरूप स्पष्ट करा.

८. किरण गुरव यांच्या जुगाड कादंबरीने गावा आणि शहर यांच्यात निर्माण झालेले नवे पूल अधोरेखीत केले आहेत, हे साधार स्पष्ट करा.

९. जुगाड ही कादंबरी गाव आणि शहराकडे एका समसमान दृष्टीने पाहते त्याबाबत कोणताही आपपरभाव बाळगत नाही, या विधानाचा विस्ताराने वेध घ्या.

१० किरण गुरव यांच्या जुगाड या कादंबरीतील आधुनिकतेच्या संदर्भाची सविस्तर नोंद घ्या.

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. जुगाड कादंबरीतील प्रमुख घटना प्रसंग उद्योगजगताशी संबंधीत आहेत या विधानाची साधार चर्चा करा.

२. जुगाड मधील व्यक्तिरेखांचा परिचय करून द्या.

३. जुगाड या कादंबरीतील शशाचे व्यक्तिचित्र रेखाटा

४. जुगाड मधून प्रतिबिंबित होणाऱ्या पर्यावरणाचे स्वरूप स्पष्ट करा.

५. कादंबरीतील विविध कंपन्यामधील मुलाखती संदर्भात घडणाऱ्या घटना, प्रसंगाचे विस्ताराने वेध घ्या

६. कादंबरीतील शशा या केंद्रवर्ती व्यक्तिरेखाच्या आयुष्यातील आवंढा दाटून येणाऱ्या प्रसंगांची चर्चा करा.

७. कादंबरीतील राधामाई मध्ये काम करणाऱ्या हॉलमार्क आणि वुईमन मधील कर्मचाऱ्यांचे स्वभाव विशेष नोंदवा.

८. कादंबरीतील श्री लॉज आणि परिसराचे विस्ताराने विवेचन करा.

९. टेलिको कंपनीतील  तेजी मंदीच्या काळातील कामाच्या स्वरूपाचे विस्ताराने विवेचन करा.

१०. कादंबरीतील कथासूत्रांच्या आधारे नवदोत्तरी काळात गाव आणि शहरामधील संबंधामध्ये होत असलेल्या बदलाचे स्वरूप स्पष्ट करा.

**थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. शशाचे स्वभाव विशेष सांगा.

२. श्री लॉजच्या वातावरणाचे चित्र स्पष्ट करा.

३. सीमा आणि शशा यांच्यातील भावाबंध स्पष्ट करा.

४. माळवीचे व्यक्तिचित्राचे कोणते विशेष तुम्हास जाणवले ते सांगा.

५. डिसुझा या व्यक्तिरेखेचे वर्णन तुमच्या शब्दात करा.

६. ग्रामीण भागातील कोणत्या श्रध्दा अंधश्रध्दा कादंबरीत आल्या आहेत ?

७. हॉलमार्क कंपनीतील कर्मचाऱ्याचे जगणे तुमच्या शब्दात सांगा.

८. पुण्यात टेंपररी नोकरी करणाऱ्या तरूणांचे भावविश्व कादंबरीत कसे रेखाटले आहे? ते स्पष्ट करा.

९. पुण्यातील मालाक्काच्या घराचे चित्रण कादंबरीत कसे आले आहे ? ते विशद करा

१० माळवीच्या लग्नप्रसंगाचे वर्णन तुमच्या शब्दात करा.

११. राधामाई मिनरलच्या चेअरमनचे स्वभावगुण कादंबरीत कसे प्रकट झाले आहेत ते तुमच्या शब्दात सांगा.

१२. शशाच्या मनात येणाऱ्या आत्महत्येच्या विचाराचे दर्शन लेखकाने कसे घडविले आहे.

१३. मणेर या व्यक्तिरेखेची शोकांतिका तुमच्या शब्दात स्पष्ट करा

१४. राधामाईच्या इन्स्पेक्शनच्या प्रसंगाचे चित्रण करा

१५ जुगाड कादंबरीचे वाङ्मयीन विशेष सांगा

१६ जुगाड कादंबरीच्या कथनशैलीचे साधार विवेचन करा.
१७ जुगाड कादंबरीत आलेली प्रतिमाकता स्पष्ट करा.

१८ जुगाड कादंबरीचे भाषाविशेष सांगाा

१९. जुगाड या शब्दाचा तुम्हाला समजलेला अर्थ स्पष्ट करा

२०. जुगाडच्या कथनशैलीवर महानुभाव गद्याचा प्रभाव आहे हे सोदाहरण स्पष्ट करा

**लघुत्तरी प्रश्न**

१. तुमच्या गावात झालेल्या साहित्य संमेलनाचा वृतांत लिहा.

२. महाविद्यालयातील स्नेहसंमेलनाचा वृतांत लिहा.

३. महाविद्यालयात घेण्यात आलेल्या शिवस्वराज्य दिनाचा वृतांत लिहा.
४. शैक्षणिक सहलीचा वृतांत लिहा.

५. तुमच्या महाविद्यालयात झालेल्या युवामहोत्सवाचा वृतांत लिहा.

६. तुम्ही अनुभवलेल्या काव्य संमेलनाचा वृतांत लिहा

७. वृतांत लेखनाचे विशेष सांगा

८. वृतांत लेखकाने कोणती दक्षता घ्यावी हे तुमच्या शब्दात सांगा

९. वृतांत लेखनाच्या भाषाशैलीचे विशेष सांगा.

१० वृतांताच्या घटकांची चर्चा करा.